**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९६७ दि. ०९/०९/२०१९**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## मंडई परिसरातील हिना वाईन्स मध्ये विना परवाना दारु पितांना मॅनेजरसह ०९ तळीरामांना अटक.

दिनांक-०८/०९/२०१९ रोजी मा. स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुधाकर यादव, सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग, पुणे शहर हे त्यांचे स्टाफसह सार्वजनिक गणेशोत्सवाचे निमित्ताने बंदोबस्त कर्तव्यावर असतांना व ते सदरवेळी बाबुगेनु गणपती मंडळा जवळ आले असतांना त्यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत हिना वाईन्स १४०९, शुक्रवार पेठ, पुणे येथून दारू विकत घेवून काही लोक दुकानामध्ये दारू पिण्याची परवानगी नसताना विनापरवाना दारू पित असलेबाबत माहीती मिळाली. त्यानुसार त्यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे अधिकारी श्री. विजय जाधव, पोलीस उप निरीक्षक यांना समक्ष बोलावुन घेवुन वरनमुद बातमीचा आशय सांगुन सदर ठिकाणी जावून खात्री करून कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे विश्रामबाग पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री. विजय जाधव यांनी पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक धिरज पवार, पोलीस शिपाई राहुल पवार, सचिन जगदाळे, चेतन शिरोळकर वगैरे स्टाफसह दोन पंचांसमवेत हिना वाईन्स १४०९, शुक्रवार पेठ, पुणे येथे २०.३० वा. जावून पाहणी करता सदर दुकानाचे काऊंटरवर एक इसम दारूची विक्री करीत असताना दिसला. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव राहुल रोहिदास मुखे वय ३५ वर्षे रा. मु. पो. जेवळी ता. लोहारा जि. उस्मानाबाद सध्या रा. जनता वसाहत लेन नंबर १, आनंदमठ, पर्वती पुणे असे असल्याचे सांगीतले. सदर दुकानाचे आतील बाजूस असलेला दरवाजा उघडून पाहिला असता तेथील एका खोलीत तिन बाजूस कडाप्प्याचे काऊंटरवर ग्लास व दारूची बाटली ठेवून काही लोक उभे राहून दारू पित असल्याचे दिसले. त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे १) मोहन सदाशिव शिर्के वय ४९ वर्षे रा. स. नं. ९२, लक्ष्मीनगर, दत्तवाडी पोलीस ठाणे समोर, पुणे २) बबन दत्तात्रय गोंदकर वय ५४ वर्षे रा. मु. पो. पिरंगुट लवळे फाटा, ता. मुळशी जि. पुणे ३) महादेव एडबा डोळसे वय ५८ वर्षे रा. रामकृष्ण मठासमोर, १३० दांडेकर पुल, पुणे ४) शिवप्रसाद मच्छिंद्रनाथ चव्हाण वय २८ वर्षे रा. मु. पो. हस्तपोखरी ता. अंबड जि. जालना सध्या रा. ज्ञानेश्वर मंगल कार्यालय, पुणे ५) संकेत शिवदास रासकर वय २५ वर्षे रा. १३६९ सदाशिव पेठ, पुणे ६) मारूती महादवे कसबे वय २८ वर्षे रा. गल्ली नंबर ८, जयभवानी नगर, पर्वती पायथा, पुणे ७) अमित अशोक सुरगुडे वय ४२ वर्षे रा. १३५८ सदाशिव पेठ, गजरेवाडा, पुणे ८) विवेक प्रदिप कदम वय ३७ वर्षे रा. ७१५/ए गुरूवार पेठ, पुणे ९) गणेश त्र्यंबक

दुधभाते वय ३० वर्षे रा. जयभवानी नगर, महिलामंडळामागे, पुणे असे असल्याचे सांगीतले. त्यांना सदर ठिकाणी दारू पिण्याबाबत विचारता त्यांनी सांगीतले की, "सदर दारू दुकानातील काऊंटरवरील राहुल रोहिदास मुखे याने त्यांनी विकत घेतलेल्या दारूच्या पैशाव्यतिरीक्त जास्तीचे २० रूपये घेवून तेथे दारू पिण्याची परवानगी दिल्याचे व त्यांना ग्लास व पाणी पुरविल्याने ते तेथे दारू पित आहे." असे सांगीतल्याने राहुल रोहिदास मुखे कडे तेथे गि-हाईकांनी दारू पिण्याचा परवाना आहे काय असे विचारता त्याने परवाना नसल्याचे सांगीतले. सदरवेळी पोलीस उप-निरीक्षक जाधव, विश्रामबाग पोलीस ठाणे यांनी दुकानातील आतील खोलीची पंचांसमक्ष पाहणी करून तेथील दारू पिण्याकरीता उपस्थित लोकांचे समोरील एकुण ९ क्वार्टर त्यामध्ये एकुण ३ मॅकडॉल व्हिस्की, इंम्पीरियल ब्लू ०३, गोवा व्हिस्की ०१, हायवर्ड ०१ व रॉयल चॅलेंज ०१ व एकुण ९ क्वार्टर बाटल्या अर्धवट भरलेल्या व ०९ काचेचे ग्लास असा एकुण १३८५/- रुपये किंमतीचा माल पंचांसमक्ष जप्त करून ताब्यात घेतलेला आहे.

सदर बाबत श्री. संजय जगन्नाथ दगडे, पोलीस हवालदार, नेमणुक-विश्रामबाग पोलीस ठाणे, पुणे शहर, यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर,गुन्हा नोंद क्रमांक-३२०/२०१९, महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६६ (१) (ब), ६८ व ८६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आलेला असुन यांतील वरनमुद एकुण १० आरोपींना अटक करण्यांत आलेली आहे.

(दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.